# मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांचे कार्यालय

'वनभवन' उस्मानपुरा, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ दूरध्वनी: ०२४०-२३४५५०८

ई-मेल व्दारे

जा.क्र.कक्ष-४/ मालकी/ कि.प./ प्र.क्र.३९ / 1381 /२०१८-१९
औरंगाबाद- ४३१ ००५ दि.21/ ०६/ २०१८

विषय: स्थाई आदेश क्र.१९ अन्वये निर्गमित सूचनेप्रमाणे अवैधरित्या तोडण्यात आलेल्या झाडांच्या थुटांची किंमत व जप्त करण्यात आलेल्या मालाच्या किंमतीकरीता अनुसूचित दर मंजूर करणेबाबत.

संदर्भ:१) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-४/ मालकी/ कि.प./ प्र.क्र.३९ / ३६४९/२०१८-१९ दि.२५/१०/२०१७

२) उप वनसंरक्षक, औरंगाबाद यांचेकडील पत्र क्र.अ/ जमीन/ मुल्यांकन/ ३८३/ सन १८-१९ औरंगाबाद दि.१४/०६/२०१८

३) मुख्य वनसंरक्षक(प्रादेशिक) अमरावती यांचे कडील पत्र क्र.कक्ष-१०/ सां/ अनुदर-वगु/ प्र.क्र.३१५/ ३४४०/ २०१७ दि.१४/०३/२०१७

उप वनसंरक्षक औरंगाबाद यांनी त्यांचेकडील संदर्भ क्र.२ चे अन्वये सध्या शेतक-यांचे जमीनीमधून शासकीय रस्त्यासाठी जमीन संपादन करण्यात येत आहे असे नमुद करुन, त्यामध्ये शेतक-यांच्या शेतामधील असलेली सर्व झाडे बाधीत होत आहे व त्या बाधीत झाडाचे मुल्यांकन वन विभागामार्फत होत आहे. मागील मुल्यांकन दर सूची कमी असल्याची तक्रार अनेक शेतक-यांनी केलेली आहे असे कळविले आहे. त्यामुळे अमरावती वनवृत्तात सन २०१६-१७ पासून वापरण्यात येणारे अनुसूचित दरपत्रका प्रमाणे दर वापरण्यास परवानगी देणेबाबत विनंती केलेली आहे.

या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये अवैधरित्या तोडण्यात आलेल्या झाडांचे (थुटांचे) मुल्य तसेच वन गुन्हा प्रकरणात अंतर्भुत असलेल्या इमारती मालाचे तसेच विविध प्रकल्पाअंतर्गत संपादित करण्यात येणा-या खाजगी क्षेत्रातील उभ्या झाडांचे मुल्यांकन ठरविण्याकरीता यवतमाळ वनवत्ताने वर्ष २०१५-१६ करीता मंजूर केलेल्या अनुसूचित दराचा वापर करणेबाबत सूचित करण्यात आले होते. तथापि वर्ष २०१८-१९ सुरु आहे. त्यामुळे या वर्षासाठी सन २०१५-१६ या वर्षाकरीता मंजूर केलेल्या अनुसूचित दराचा वापर करणे संयुक्तीक होणार नाही. या गोष्टीचा विचार करुन **अमरावती वनवृत्ताने वर्ष २०१६-१७ करीता** संदर्भ क्र.३ अन्वये मंजूर केलेले अनुसूचित दर या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत.

त्यानुषंगाने मा.प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-१८/ दक्षता/ प्र.क्र.१०२(०७-०८)/ ९३ दिनांक २४/०४/२००९ अन्वये निर्गमित केलेल्या स्थाई आदेश क्र.१९ मधील सूचनेनूसार अवैधरित्या तोडण्यात आलेल्या झाडांचे (थुटांचे) मुल्य तसेच वन गुन्हा प्रकरणात अंतर्भुत असलेल्या इमारती मालाचे मुल्य ठरविण्याकरीता या सोबत या कार्यालयाने प्राप्त करुन घेतलेले **अमरावती वनवृत्ताने वर्ष २०१६-१७ करीता** संदर्भ क्र.३ अन्वये मंजूर केलेले अनुसूचित दराची प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव या सोबत सहपत्रित करण्यात येत असून सूचित करण्यात येते की, यापुढे आपले वन विभागात अवैधरित्या तोडण्यात आलेल्या झाडांचे (थुटांचे) मूल्य तसेच वन गुन्हा प्रकरणा अंतर्भुत असलेल्या इमारती मालाचे तसेच विविध प्रकल्पाअंतर्गत संपादित



Scanned by CamScanner

करण्यात येणा-या खाजगी क्षेत्रातील उभ्या झाडांचे मुल्यांकना ठरविण्याकरीता **अमरावती वनवृत्ताने वर्ष २०१६-१७ करीता** मंजूर केलेल्या अनुसूचित दराचा वापर करावा.

सहपत्र: वरील प्रमाणे.

(प्र.का.महाजन)
मुख्य वन संरक्षक
(प्रादेशिक) औरंगाबाद

प्रति,
उप वन संरक्षक, औरंगाबाद, नांदेड
विभागीय वन अधिकारी परभणी, बीड, हिंगोली, उस्मानाबाद

प्रतिलिपी : 1. विभागीय वन अधिकारी (कॅम्पा व इतर) (मुख्यालय व नियोजन) यांना माहितीस्तव

2. या कार्यालयातील कक्ष-9 / सांख्यिकी यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना

Scanned by CamScanner

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती वनवृत्त, कॅप अमरावती -444602
कार्यालयीन दुरध्वनी 2662090/2662593. 2662680 (वैयक्तीक), फॅक्स-2663314
वनसंपर्क दुरध्वनी (निशुल्क) 155314 (फक्त लँड लाईन वरुन संपर्कासाठी)
वेब साईट - ccftamt.gov.in/ ई मेल पत्ता ccftamravati@mahaforest.gov.in /aticcfa@gmail.com

विषय- स्थाई आदेश क्र. 19 अन्वये निर्गमित सुचनेप्रमाणे अवैधरित्या तोडण्यात आलेल्या झाडांच्या थुटांची किमंत व जप्त करण्यात आलेल्या मालाच्या किमंतीकरिता अनुसुचित दर मंजुर करणेबाबत – वर्ष -2016-17

क्र– कक्ष-10/सां/अनुदर-वगु/प्र.क्र.315/3440 /2017

अमरावती -2, दिनांक 14/03/2017

उप वनसंरक्षक (सर्व) अमरावती वनवृत्त यांनी कळविण्यात येते की, मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-18/दक्षता/ प्र.क्र. 102(07-08)/ 93, दि. 24/04/2009 अन्वये निर्गमित केलेल्या स्थाई आदेश क्रमांक 19 मधिल सुचनेनुसार अवैधरित्या तोडण्यात आलेल्या झाडांचे (थुटांचे) मुल्य तसेच वनगुन्हा प्रकरणात अंतर्भुत असलेल्या इमारती मालाचे मुल्य ठरविण्याकरीता खालील प्रमाणे अनुसुचित दर मंजुर करण्यात येत आहेत.

अ) स्थाई आदेश क्रमांक 19 मधिल बाब क्रमांक vii) प्रमाणे अवैध कटाई झालेल्या वृक्षांची किमंत ठरविण्या करिता प्रजातीनिहाय अनुसुचित दर.

| अ. क्र. | थुटाच्या उंचीवर (जमिनी पासुन 15 से.मी) गोलाई वर्ग (साली सहीत) (से.मी.) | त्यासंबंधात छाती उंचीवरील गोलाई वर्ग (साली सहीत) (से.मी.) | अमरावती वनवृत्ता करिता प्रती झाड रुपांतर गुणक (घनमीटर) | प्रती थुट दर सागवान (रु) | प्रती थुट दर उच्च प्रजाती आडजात (ऐन, बिजा, शिसम, शिवण, हल्दू, कलम इत्यादी) (रु) | प्रती थुट दर निम्न प्रजाती आडजात इमारती (तेंदू, मोहा, बेहडा, सालई, सेमल इत्यादी) (रु) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | 15-U-30 | 15-U-30 | 0.007 | 327 | 174 | 56 |
| 2 | 31-U-45 | 15-U-30 | 0.016 | 747 | 397 | 128 |
| 3 | 46-U-60 | 31-U-45 | 0.037 | 1728 | 917 | 297 |
| 4 | 61-U-75 | 46-U-60 | 0.061 | 2850 | 1512 | 489 |
| 5 | 76-U-90 | 61-U-75 | 0.094 | 4391 | 2331 | 754 |
| 6 | 91-U-105 | 76-U-90 | 0.145 | 6774 | 3595 | 1163 |
| 7 | 106-U-120 | 76-U-90 | 0.211 | 9857 | 5231 | 1693 |
| 8 | 121-U-135 | 91-U-105 | 0.294 | 13734 | 7289 | 2359 |
| 9 | 136-U-150 | 106-U-120 | 0.385 | 17985 | 9546 | 3089 |
| 10 | 151-U-180 | 121-U-135 | 0.542 | 25320 | 13438 | 4348 |
| 11 | 181-U-210 | 136-U-150 | 0.763 | 35644 | 18918 | 6121 |
| 12 | 211 and up | 151-U-180 | 1.011 | 47229 | 25067 | 8111 |

Scanned by CamScanner

ब) स्थाई आदेश क्रमांक 19 मधिल बाब क्रमांक (vi) b (viii) प्रमाणे निव्वळ प्रती घनमीटर सरासरी दर (प्राप्त सरासरी दर (-) निष्कासनाचा प्रत्यक्ष खर्च).

वनगुन्हा प्रकरणात अंतर्भुत असलेल्या (जागेवर सापडलेल्या / जप्त केलेल्या) मालासाठी प्रती घनमीटर अनुसुचित दर –

| प्रजाती | निव्वळ प्रती घनमीटर सरासरी दर (रु.) | शेरा |
|---|---|---|
| 1 | 5 | |
| सागवान | 46715 | |
| उच्च प्रजाती आडजात (ऐन, बिजा, शिसम, शिवण, हल्दू, कलम इत्यादी) | 24794 | |
| निम्न प्रजाती आडजात इमारती (तेंदू, मोहा, बेहडा, सालई, सेमल इत्यादी) | 8022 | |

क) वनगुन्हा प्रकरणात अंतर्भुत असलेल्या जलतन, बांबु व चिराण मालाकरिता खालील प्रमाणे अनुसुचित दर मंजुर करण्यात येत आहे.

| प्रजाती | सन 2016-17 करिता अनुसुचित दर (रु.) | शेरा (एकक) |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| अ) मऊ प्रजाती जलतन | 575 | प्रती रचित घनमीटर |
| ब) कठीण प्रजाती जलतन | 1150 | प्रती रचित घनमीटर |
| क) लांब बांबू (प्रती नग) | 34 | प्रती नग |
| ड) सागवान चिराण | 62287 | प्रती घनमीटर |
| इ) उच्च प्रजाती आडजात चिराण (ऐन, बिजा, शिसम, शिवण, हल्दू, कलम इत्यादी) | 33058 | प्रती घनमीटर |
| फ) निम्न प्रजाती आडजात इमारती चिराण (तेंदू, मोहा, बेहडा, सालई, सेमल इत्यादी) ... | 10696 | प्रती घनमीटर |

सदरचे अनुसुचित दर हे तात्काळ प्रभावाने अंमलात आणण्यात येत असुन, हे दर दि. 30/09/2017 पर्यंत वा पुढील आदेशापर्यंत अंमलात राहतील

(मसुदा/का.प्र. मु.व.स.(प्रा) अमरावती यांचेकडुन मंजुर)

मुख्य वनसंरक्षक
(प्रादेशिक), अमरावती करीता.

प्रति,

1) उप वनसंरक्षक (सर्व)

2) विभागीय वन अधिकारी (नियोजन / दक्षता) निर्देशन विभाग, अमरावती

Scanned by CamScanner